# परभणी जिल्हयातील वाळू गटांचे पर्यावरण अनुमतीसाठी मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार नेमणूक करिता ई-निविदा

जा.क्र.2018/महसूल/गौ.ख./कावी 348
जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी
दिनांकः- 10 /01/2018

जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांच्याकडुन सर्व मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) यांना कळविण्यात येते कि, परभणी जिल्हयातील सन 2017-2018 व सन 2018-2019 वर्षाकरिता वाळू गटांचा पर्यावरण अनूमती मिळविण्यासाठी Form 1/1M, EIA, EMP व Ming Plan तयार करण्यासाठी ई-निविदा खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मागविण्यात येत आहे. सदरिल निविदेची कार्यवाही https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

| | | |
|---|---|---|
| ईनिविदा प्रसिध्दी | 12/01/2018 | -- |
| ईनिविदा स्वीकृती | 24/01/2018 | वेळ 16.00 पर्यंत |
| ईनिविदा उघडणे | 25/01/2018 | वेळ 16.00 |
| अनामत रक्कम | रुपये 55000/- | -- |

**<u>अटी व शर्ती</u>**

1. ईनिविदा अर्ज शुल्क रु. 3500/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावे लागेल.
2. ई-निविदा अनामत रक्कम रुपये 55000/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावी लागेल.
3. पर्यावरण सल्लागार ( Accredited Environment Consultant) mining of minaerals या विभागात Quality Council of India(QCI) किंवा National Accreditation Board for Education and Training या व्दारे मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.
4. वाळू गटांच्या पर्यावरण अनूमती मिळवण्यासाठी, Form 1/1M, EIA, EMP व Mining Plan तयार करण्याचा कमीत कमी दोन वर्षाचा अनूभव असणे आवश्यक आहे.
5. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौखनि-10/0615/प्र.क्र.289/ख दि.03/01/2018 केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातारणीय बदल मंत्रालयाच्या दि 14 सप्टेंबर 2006 (CIA Notification) दि.15/01/2016 व दि. 03/03/2016 च्या तरतूदी लागु राहतील.
6. सदर निविदा परभणी जिल्हयातील सन 2017-2018 व सन 2018-2019 वर्षाकरिता शासन नियमाप्रमाणे निश्चित केलेल्या वाळु गटांकरिता असेल वाळू/रेती सुधारित धोरण 2018 प्रमाणे वाळूगटांचे अंतर 200 मी. पेक्षा कमी अंतर असल्यास सदर वाळूगट एकच असल्याचे गृहीत धरण्यात येईल.
7. एका वाळू गटाकरिता सर्वात कमी किंमत ई निविदा मध्ये प्राप्त होईल ती निविदा अट क्र.2,3 व 4 च्या अधीन राहून मान्य करण्यात येईल.
8. निविदा मान्य झाल्यावर कोणतेही अग्रीम रक्कम अनुज्ञेय राहणार नाही, काम पुर्ण झाल्यानंतर देयक अदा केले जाईल.
9. पर्यावरण अनुमती प्राप्त करुन देणे Form 1/1M, EIA, EMP व Mining Plan केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि.15/01/2016 च्या तरतुदीनुसार व शासन नियमाप्रमाणे रेती गट निश्चित केल्यावर 20 दिवसात पुर्ण करणे बंधनकारक राहील.

10. ज्या वाळुगटास राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय पर्यावरण समितीची मान्यता मिळाल्यावर पुर्ण रक्कम अनुज्ञेय राहील.
11. वाळु लिलाव झाल्यावर संबंधित लिलावधरकाच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग करुन देणे, Mining Plan व इतर आवश्यक तांत्रिक कागदपत्रे संबंधित लिलावधरकाच्या नावे हस्तांतरण करणे आवश्यक राहील.
12. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पर्यावरण बैठकीस Mining of minerals प्रवर्गातील in-house expert हजर राहणे आवश्यक राहील व प्रतिनिधी पाठविता येणार नाही, या बाबत कुठलाही वाहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
13. निविदा मान्य झाल्यानंतर रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा दोन दिवसाचा आत करावा लागेल.
14. अटी व शर्तीचे पालन न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल आवश्यकते प्रमाणे इतर दंडात्मक रक्कम देयकातुन वजा केली जाईल.
15. कुठलीही पुर्वसूचना न देता कोणत्याही वेळी करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी परभणी यांना राहतील.
16. अटी व शर्ती मध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचा करण्याचा एखादी अट शिथिल करण्याचा वा अट रद्द करण्याचा किंवा नवीन अट समाविष्ट अधिकार जिल्हाधिकारी परभणी यांना राहतील.
17. सदर प्रकरणी काही वाद उद्भवल्यास परभणी न्यायपालिकेच्या अधिकार क्षेत्रात सोडवण्यात येतील.।
18. कोणतेही कारण न देता निविदा नाकरण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी परभणी यांना राहतील.
19. मा.न्यायालय व मा.हरित लवाद वेळोवेळी जे आदेश देतील ते लागू राहतील.
20. ज्या निविदाधारकाची निविदा मंजूर होईल त्यांना सुरक्षा अनामत रक्कमरु.७५०००/- शेडयूल्ड बँकेचे बँक गॅरंटी वा धनाकर्ष (D.D.) च्या स्वरुपात २ दिवसाचे आत जमा करावी लागेल अनामत रक्कम अथवा सुरक्षा अनामत रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
21. दर नमुद करताना G.S.T वा इतर सर्व करावा बोजा विचारात घेऊनच सर्व करासह दर नमुद करावेत देयक अदा करताना आयकर आदी सर्व T.D.S. च्या रक्कमा नियमानुसार वजा करुनच देयक अदा केले जाईल.
22. निविदेमध्ये सहभागी होण्यास आवश्यक कागदपत्रे.

**अ. तांत्रिक लिफाफा**

1.अट क्र.2 नुसार मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार असल्याचे प्रमाणपत्र.

2.PAN Card

3.GST नोंदणी प्रमाणपत्र

4.दोन वर्ष कामाचे अनुभव असल्यचे प्रमाणपत्र

5.सदर निविदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र

6.निविदा फॉर्म शुल्क व अनामत रक्कम भरलेली पावती.

7.मागील वर्षाचे आयकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र (IT Returns)

(वरील सर्व कागदपत्रे Scan करुन तांत्रिक लिफाफ्यामध्ये अपलोड करावे लागतील)

**ब. तांत्रिक लिफाफा**

1.सदर BOQ मध्ये दरनमुद करुन BOQ अपलोड करावा.

जिल्हाधिकारी परभणी